ISSN 2278-8808 SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# मुस्लीम समाजातील परित्यक्ता स्त्रियांवरील कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप, प्रकार आणि कारणांचा अभ्यास (संदर्भ : अकोला शहर)

**सुरेश शिवराम सुर्यवंशी**

*संशोधक विद्यार्थी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे– ३७*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

निकाह हा मुस्लीम धर्मात एक करार मानला आहे. या करारामुळे स्त्री पुरुष एकत्र येऊन वैवाहिक नात्यात पदार्पण करतात. भूतलावरील प्रत्येक व्यक्ती विभिन्न स्वभाव, विचार, आचार, गुण–दोष असणाऱ्या आणि चालीरीतीत, संस्कृतीत, ग्रामीण भागात किंवा शहरी भागात वाढलेल्या असतात. विवाहानंतर प्रत्येक पतीपत्नीमध्ये वेगवेगळ्या कारणाने काही क्षण वाद–विवाद, मतभेद आणि मनस्तापाचे येत असतात. अशावेळी त्या कुटूंबातील सदस्यांनी जर एकमेकांसोबत समायोजन केले तर त्यांचे आयुष्य सुखी समाधानी चालते. पुढे अशा कुटुंबाची प्रगतीपण होते. पण काही कुटुंबात एकमेकांना समजून न घेतल्याने पती–पत्नीचे मतभेद अगदी टोकाला गेलेले असतात तिथे वैवाहिक स्वास्थ्याला धोका निर्माण होतो.

कोणत्याही कुटुंबात सहजासहजी/अचानकपणे स्त्रियांवर अत्याचार/हिंसाचाराला कधीच सुरुवात होत नसते हिंसाचार झाला तर त्याचे पाळेमुळे भूतकाळातून सुरुवात झालेली असतात आणि वर्तमानात त्या घटना घडत असताना भविष्यामध्येही त्याचे परिणाम जास्त दिसून येतात. कधी पतीकडून स्त्रीला एकतर्फा तलाक देऊन तर कधी तलाक न देता संसारातून बेदखल करुन परित्याग केला जातो व कधी स्त्री सासरच्या कौटुंबिक हिंसाचाराला कंटाळून किंवा असहाय्य झाल्यानंतर स्वतःच पतीचा परित्याग करते अशा परित्यक्ता झालेल्या स्त्रियांच्या वैवाहिक स्थैर्याला धोका निर्माण झाल्यानंतर त्यांच्या हक्कासाठी महिला तक्रार निवारण केंद्र पोलीस अधिक्षक कार्यालय अकोला, महिला समुपदेशन केंद्र (स्वयंसेवी संस्था) व न्यायालयात दाद मागतात. त्यापैकी मुस्लीम समाजातील व्यक्तीचे दावे दाखल

होण्याचे प्रमाणही वाढत आहे. सध्या ते प्रमाण इतर जाती धर्मापेक्षा दुसऱ्या क्रमांकावर आहे हे सारणी क्र. १ मध्ये दिसून येईल. तसेच महिला समुपदेशन केंद्र आणि पोलीस अधिक्षक कार्यालयातील केसेस दाखल होण्याचे प्रमाण हे स्वतंत्र आहे. परित्यक्ता स्त्रियांचे शासकीय यंत्रणेची मदत मागण्यासाठी (न्याय) घराबाहेर पडल्यामुळे परित्यक्ता स्त्रियांचा प्रश्न दिसून येत आहे. व त्याची संख्या अधिक असण्याची शक्यता आहे. त्यामुळे परित्यक्ता स्त्रियांचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. परित्यक्ता होण्याचे मुळ कारणे काय आहेत. यावर उपाययोजना काय करता येईल हा उद्देश संशोधक अभ्यासकांनी ठेवला आहे.

**सारणी क्र. १ : अकोला शहराची लोकसंख्या आणि कौटुंबिक न्यायालयात समुपदेशनासाठी संदर्भित परित्यक्ता व्यक्तींच्या दाव्याची संख्या दर्शविणारी सारणी :**

| अनु. | धर्म | अकोला शहराची लोकसंख्या | समुपदेशनासाठी आलेल्या दाव्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | हिन्दू | २३३८९४ (५४.९३% | २२५ (५१.७२%) |
| २ | मुस्लीम | १२७४६८ (२९.९३%) | ०८७ (२०.००%) |
| ३ | बौद्ध | ५४९९१ (१२.९१%) | ०९९ (२२.७५%) |
| ४ | जैन | ६१९९ (१.४६%) | ००७ (१.६०%) |
| ५ | ख्रिश्चन | १७८४ (०.४२%) | ००६ (१.३७%) |
| ६ | शिख | ८७० (०.२०%) | -- |
| ७ | इतर | १०५ (०.०२%) | ०११ आदिवासी (२.५२%) |
| ८ | नाट स्टेटड | ५०६ -(०.१२%) | |
| | एकूण | ४२५८१७ (१००%) | ४३५ (१००%) |

**अभ्यासाचा उद्देश :**

१) मुस्लीम समाजातील स्त्रियांच्या परित्यक्ता होण्याच्या कारणांचा अभ्यास करणे.

२) परित्यक्ता होण्याचे प्रमाण कमी होण्यासाठी उपाय योजना सुचविणे.

३) **अभ्यास पध्दती :** प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी मुस्लीम समाजातील परित्यक्ता स्त्रियांवरील कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप, प्रकार आणि कारणांचा अभ्यास करत असताना गैर संभाव्य नमुना निवड पध्दतीमधील सोयीस्कर अथवा सुविधाजनक नमुना पध्दती नुसार एकूण ६० परित्यक्ता स्त्रियांच्या मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून माहिती संकलित केली आहे.

**कौटुंबिक हिंसाचाराचे प्रकार :–**

१) मानसिक/भावनिक हिंसाचार

२) शारीरिक हिंसाचार

३) लैंगिक हिंसाचार

४) आर्थिक हिंसाचार

५) हुंड्यासंबंधी

**कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप :**

१) **मानसिक/भावनिक हिंसाचार :** स्त्रीचा अपमान करणे, टोमणे मारणे, दोष देणे, माहेरच्या मंडळीचा सतत उद्धार करणे, चारित्र्यावर संशय घेणे, नातेवाईकांना भेटण्यास मज्जाव करणे, आत्महत्या करण्याची धमकी देणे, आत्महत्येस प्रवृत्त करणे, माहेरची इज्जत काढणे, मुली होतात मुलगा होत नाही किंवा मूल होत नाही म्हणून वांझ म्हणून अपमान करणे इ. मानसिक हिंसाचार म्हणावे.

२) **शारीरिक हिंसाचार :** चापट मारणे, लाथ मारणे, कोणतीही वस्तू किंवा हत्यार मारण्यासाठी वापरणे किंवा प्रत्यक्ष कृती करणे, दारू पिऊन अघोरी मारहाण करणे, गळा दाबणे, चावणे, चिमटा काढणे, जाणीवपूर्वक धक्के मारणे/ढकलणे, जाळून टाकण्याची धमकी देणे किवा रॉकेल टाकून जाळण्याचा प्रयत्न करणे. शरीराचा कोणताही भाग अधु/निकामी होईपर्यंन्त मारणे किंवा रक्त येण्यापर्यंत कोणतीही कृती करणे याला शारीरिक हिंसाचार म्हणावे.

३) **लैगिक हिंसाचार :** स्त्रीच्या इच्छेविरुद्ध तिला बीभत्स चित्रपट/माहीतीपट पाहण्यास लावणे, त्याप्रमाणे किळसवाणा प्रकार करण्यास लावणे किंवा स्त्रीच्या विरोधात लैगिक संबंध ठेवणे/अनैसर्गिक संबंध ठेवणे, पुरुषाच्या दोषामुळे मूल होण्यासाठी दुसऱ्या भोंदु महाराज/पुरुषाकडे पाठविणे, स्त्रीच्या संबंधावेळी छुपा पध्दतीने फोटो काढणे, शुटींग करणे, नंतर ब्लॅकमेल करणे, अश्लील शिव्या देणे, पाळीच्या काळात जबरदस्तीने संबंध ठेवणे आणि माहेर/सासरच्या नात्यातील पुरुषाकडून लैंगिक संबंधासाठी बळजबरी करणे इ. स्वरूपाचा लैंगिक हिंसाचारात समावेश होतो. स्त्रीला लैंगिक संबंध नको असल्यास नाही बोलण्याचा अधिकार आहे.

४) **आर्थिक हिंसाचार :** स्त्रीला व मुलासाठी घरखर्चाला पैसे न देणे, घरभाडे न देणे, स्त्रीला आर्थिक संधीपासून दूर ठेवणे, तिची आर्थिक कोंडी करणे, मुलांना व पत्नीला शिक्षणासाठी, दवाखाना

औषधोपचारासाठी खर्च न देणे. स्त्रीचा पगार/उत्पन्न किंवा मजुरी जबरदस्तीने काढून घेणे व त्याचा दुरुपयोग करणे. इ. स्वरूप आर्थिक हिंसाचारामध्ये समावेश होतो (या सर्व कारणासाठी स्त्रीला मारणे).

५) **हुंडासंबंधी :** माहेरवरुन प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पैशाची मागणी करणे, लग्नामधील देण्या घेण्यावरून छळ/मारहाण, किंमती वस्तूची मागणी करणे. घर/फ्लॅट घेण्यास गाडी घेण्यास विहीर खोदण्यास, पाईप लाईन टाकण्यास, नोकरी लावण्यास पैशाची मागणी करणे हे सर्व स्त्रीच्या माहेरुन मिळाले नाहीतर मारहाण करणे, आत्महत्येस प्रवृत्त करणे इ. हुंडासंबंधीच्या हिंसाचाराच्या स्वरूपात समावेश होतो.

**परित्यक्ता स्त्री म्हणजे कोण :**

**व्याख्या :** कोणत्याही धर्मानुसार किंवा कायदेशीर किंवा अवैध मानलेल्या विवाहानंतर वेगवेगळ्या कारणाने सासरच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्यांनी कौटुंबिक कलहातून स्त्रीला नातेसंबंधातून बेदखल (त्याग) केला असेल किंवा एकतर्फी तलाक / घटस्फोट दिला असेल किंवा अत्याचाराला/हिंसाचाराला कंटाळून वैवाहिक नातेसंबंधातून स्वतः स्त्री बाहेर पडली असेल पण पुनर्विवाह केला नाही किंवा पतीपासून घटस्फोट मिळवला असेल व सर्व हक्क अधिकार सोडले नाहीत अशा स्त्रियांना परित्यक्ता म्हणावे.

**सारणी क्र. २ परित्यक्ता स्त्रियांचे वय दर्शविणारी सारणी**

| अनु. | वयोगट | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १७ ते २५ | ३९ | ६५.००% |
| २ | २६ ते ३५ | १७ | २८.३३% |
| ३ | ३६ ते ४५ | ०३ | ५.००% |
| ४ | ४६ ते ५५ | ०१ | १.१४% |
| | एकूण | ६० | १००% |

स्त्रोत : प्राथमिक माहितीनुसार उपलब्ध

**सारणी क्र. ३ परित्यक्ता स्त्रियांचा शिक्षणाचा स्तर दर्शविणारी सारणी :**

| **अनु.** | **शिक्षण** | **एकूण** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | १ ते ४ | १० | १६.६६% |
| २ | ५ ते १० | ३७ | ६१.६६% |
| ३ | १७ ते १२ | ०७ | ११.६६% |
| ४ | पदवी | ०५ | ८.३३% |
| ५ | पदव्युत्तर | ०२ | ३.३३% |
| | एकूण | ६० | १००% |

स्त्रोत : प्राथमिक माहितीनुसार उपलब्ध

**सारणी क्र. ४ मुस्लीम समाजातील स्त्रिया परित्यक्त होण्याची कारणे दर्शविणारी सारणी :**

| अनु. | तपशिल | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | उच्च शिक्षणाचा अभाव | १० | १६.६६% |
| २ | कौटुंबिक हिंसाचार | ०८ | १३.३३% |
| ३ | बहुपत्नीत्वाची पध्दत | ०६ | १०.००% |
| ४ | स्त्रियांना दुय्यमस्थान | ०६ | १०.००% |
| ५ | वाद आपसात सोडवित नाही | ०५ | ८.३३% |
| ६ | अहंकारी वृत्ती | ०५ | ८.३३% |
| ७ | व्यसनाधिनात/संशयी वृत्ती | ०५ | ८.३३% |
| ८ | धार्मिक साहित्याचे अध्ययन नाही | ०४ | ६.६६% |
| ९ | छ्रायवसीचा अभाव | ०३ | ५.००% |
| १० | बालविवाह पध्दत अस्तित्वात | ०३ | ५.००% |
| ११ | संयुक्त कुटुंब पध्दतीचा ऱ्हास | ०३ | ५.००% |
| १२ | कायद्याचे अपुरे ज्ञान/गैरवापर | ०२ | ३.३३% |
| | एकूण | ६० | १००% |

स्त्रोत : प्राथमिक माहीतीनुसार उपलब्ध

**निरीक्षण आणि निष्कर्ष :-**

१) वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण ६० परित्यक्ता स्त्रियांपैकी १० (१६.६६%) स्त्रियांचे म्हणणे असे आहे की, मुस्लीम समाजात उच्चशिक्षणाचे प्रमाण कमी आहे. यामध्ये स्त्रियांचे प्रमाण खूप कमी आहे. सारणी क्रमांक ३ मध्ये पाहिले तर परित्यक्ता व्यक्तीचे इयत्ता ५ वी ते १० वी पर्यन्त शिक्षण घेतलेल्या स्त्रियांचे प्रमाण ६१.६६% आहे. बारावीपर्यन्तचे ११.६६% आहे व एकदम कमी झाले. त्यापुढे पदवीसाठी फक्त पाच स्त्रिया पोहचल्या व पदव्युत्तरपर्यन्त दोन स्त्रिया पोहोचल्या आहेत यावरन निदर्शनास येते की ह्या समाजातील एकंदरीत स्त्री पुरुषाचे उच्च शिक्षणाचे प्रमाण इतर समाजाच्या मानाने कमी आहे. त्यामुळे संस्काराची कमी इतरांचे मार्गदर्शनाची कमतरता, आर्थिक प्रगती नाही त्यामुळे परित्यक्ताचे प्रमाण वाढत आहे.

२) ८ (१३.३३%) परित्यक्ता स्त्रियांना कोणत्या ना कोणत्या कारणावरुन मानसिक/भावनिक, शारीरिक, लैगिंक, आर्थिक व हुंड्यासाठी कौटुंबिक हिंसाचार झाला आहे. मुस्लीम समाजात त्याचे विवाह हे आपसातील नात्यात म्हणजे जवळच्या नात्यात जास्त प्रमाणात होतात याचा अर्थ त्या

नात्यात भांडणे किंवा स्त्रियांना मानसिक, शारीरिक, आर्थिक, लौंगिक हिंसाचार झाले नाही पाहिजे तरीसुद्धा पुरुषप्रधान मानसिकतेतून स्त्रियांवर वेगवेगळ्या कारणावरून कौटुंबिक हिंसाचार होताना दिसतात. या स्त्रिया हिंसाचाराला कंटाळून माहेरी आल्या आहेत त्यानंतर ज्याच्या पालकाची आर्थिक स्थिती चांगली आहे किंवा पालक थोडेसे जागरूक आहेत अशा पालकांनी घरी परतलेल्या मुलीचा हक्क मिळावा या हेतूने पोटगी किंवा नांदायला पाठविण्यासाठी कोर्टात, पोलिसात व समुपदेशन केंद्रात गेले आहेत.

३) ०६ (१०.००%)परित्यक्ता स्त्रिंयांना असे वाटते की, मुस्लीम समाजात बहुपत्नीकत्वाची पध्दत आहे व शरीयत कायद्याुळे ही पध्दत अस्तित्वात आहे असे वाटते. जर संसारात पटत नसेल किंवा इतर नातेवाईकांचा हस्तक्षेप असेल किंवा पुरुषाला त्याची पत्नी नको असेल तर तलाकचे नियम आहेत त्याचे पालनही काही पुरुष करत नाहीत तर काही पुरुष नियमाचे पालन करून तलाक देतील व काही पुरुष तलाक न देताच अनेक विवाह करतात व शेवटी पुरुष शरीयत कायद्याचा आधार घेतात. तसेच ज्या स्त्री पुरुषाचा तलाक झाला नाही किंवा पुनर्विवाह पण झाला नाही फक्त स्त्रीचा परित्याग केला असेल अशा स्त्रिया व मुलांचा पालन पोषणाचा प्रश्न निर्माण होतो. या बाबीकडे कोणाचेही लक्ष नाही असे स्त्रियांना वाटते.

४) ०६ (१०.००%) परित्यक्ता स्त्रियांना असे वाटते की, मुस्लीम समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. रुढी परंपरा, संस्कृती, धार्मिक कट्टरता या प्रभावामुळे पुरुषाची स्वतःची मानसिकता बदलण्याची तयारी नाही असे वाटते. कुराणात स्त्रियांना समानतेचे स्थान दिले आहे पण या गोष्टीचा सर्वाचा अभ्यास (अध्ययन) नसल्याने स्त्रियांचे स्थान पुरुषांना समजले नाही म्हणून स्त्रीला महत्त्व नाही. स्त्रियांवर अनेक बंदने लादले तसे घराबाहेर पडू न देणे, बुरखा, चूल व मूल या सारख्या पध्दतीमध्ये दाबून ठेवले आहे हे सर्व स्त्रियांना नको वाटते. त्याचा आग्रह समानता मिळावे असा आहे.

५) ०५ (८.३३%) परित्यक्ता स्त्रियांना असे वाटते की, या समाजातील व्यक्तीमध्ये गैरसमज असल्याने ते एकमेकांना समजून घेण्यास तयार नसतात. समाजातील वरिष्ठांचे मार्गदर्शन किंवा समुपदेशन होत नाही कारण आपली समस्या इतरांना कसे सांगायचे? सांगितले तर ते लोक योग्य मार्गदर्शन

करतील का? किंवा योग्य मार्गदर्शन करण्याऐवजी गैरफायदा घेतील ही भीती मनामध्ये असल्याने नातेवाईक किंवा इतराचा सल्ला घेऊन समस्येतून बाहेर पडण्याऐवजी तसाच राहतो व शेवटी स्त्रियांना असुरक्षित वाटते आणि हा प्रश्न वाढत जातो.

६) ०५ (८.३३%) परित्यक्ता स्त्रियांना असे वाटते की, समाजात अहंकारी वृत्ती आहे. एकमेकांचा वाद विवादातून क्रोध वाढत जातो एकमेकांना (पती–पत्नी) समजून घेण्यास तयार नसतात. वाद संपविण्यासाठी मी का माघार घेऊ असे विचार केल्याने वाद न संपता अहंकाराला खतपाणी मिळते. आम्ही कोर्टाचा इंगा दाखवितो, तुमचा माज कोर्टात उतरवितो असे म्हणून दावे कोर्टात, पोलिसात दाखल होतात व प्रश्न न मिटता वाढतच जातो व स्त्रिया परित्यक्ता होतात.

७) ०५ (८.३३%) परित्यक्ता स्त्रियांना असे वाटते की, दारू, गांजा, गुटखा व इतर मादक द्रव्याचे सेवन करणारे, जुगार–मटका खेळणाऱ्या पतीने व्यसन करून मारहाण करणे संशय घेणे हा प्रकार केला आहे. येथे दुसरा विचार पण त्यांनी व्यक्त केला तो म्हणजे मोबाईल व सोशल मिडीयामुळे व त्याच्या वापरामुळेही एकमेकांवर संशय घेण्याच्या वृत्तीमध्ये वाढ होत आहे. त्यामुळेही संसार तुटत आहेत. स्त्रिया परित्यक्ता होत आहेत.

८) ०४ ( ६.६६%) परित्यक्ता स्त्रियांना असे वाटते की, मुस्लीम असून सुद्धा जास्तीतजास्त लोकांनी कुराण किंवा धार्मिक साहित्याचे अध्ययन करत नाहीत. इस्लामीक साहित्य व कुराण हे नेहमी सुख, शांती, नांदण्यासाठी, सामान्याचा हक्क आणि न्याय देण्यासाठी स्थापन झालेली आहेत व तसा इस्लाम याचा दावाही करतात. असे धार्मिक साहित्य मुस्लीम धर्मीयांनी वाचण केले तर स्त्रियांवर अत्याचार/हिंसाचार होणार नाहीत पण असे होताना दिसत नाही म्हणून परित्यक्ता होण्याचे प्रमाण वाढत आहे.

९) ०३ (५.००%) परित्यक्ता स्त्रियांना असे वाटते की मुस्लीम समाजात उच्च शिक्षण नाही जे शिक्षण घेतले जाते ते उर्दू माध्यमातून असल्याने नोकरीच्या संधी नाहीत, गरिबी, कट्टर धार्मिक विचाराचा पगडा, कुटुंब नियोजन नाही त्यामुळे कुटुंबाचा आकार वाढत आहे. कमी जागेत सर्व कुटुंबातील सदस्यांना समायोजन करावे लागते आहे. कित्येक वेळा एकमेकांचे पटत नसल्याने समायोजन करणे शक्य नाही. नवीन विवाहिताना शांततेत सुसंवाद करण्यासाठी पुरेशी जागा, वेळ किवा शरीर

संबंधासाठी जागा उपलब्ध न झाल्याने प्रायवसीचा (एकांताचा) प्रश्न उद्‌भवतो. त्यात मुलांचा जबाबदाऱ्या वाढतात त्या जबाबदाऱ्या व स्त्रिच्या जबाबदाऱ्या, गरजा पूर्ण नाही झाल्यास वादविवाद वाढतात व पती–पत्नी वेगळे होतात. आर्थिक स्थिती चांगली नसल्याने पुरुषही नवीन घर घेणे किंवा भाड्याने घेणे किंवा स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेऊ शकत नाहीत शेवटी दोघेही वेगळे होतात.

१०) ०३ (५.००%) परित्यक्ता स्त्रियांना असे वाटते की, स्त्रिया एवढ्या कमी वयात परित्यक्ता झाल्या आहेत या वयात त्या स्त्रिया कोर्टात आल्या आहेत म्हणजे त्याचे लग्न वेळी वय काय असेल याची कल्पना येते. अर्थात याच्यापैकी बऱ्याच स्त्रियांचे बालविवाह झाले आहेत. अशा स्त्रियांची मानसिक/भावनिक, शारीरिक आणि मुलांना जन्म देण्याची तयारी नसते तरीपण या स्त्रियांना मूल झालेली आहेत. एवढ्या कमी वयात, स्वयंपाक, घरातील सदस्याची मनधरणी करणे, येणाऱ्या जाणाऱ्याचे उठ–बैस करणे, मुलांचे संगोपन, पतीच्या सर्व गरजा निभावणे हे कसे काय शक्य होईल त्यामुळे स्त्री कुठे तरी कमी पडणार अशा वेळी तिला न समजुन घेतल्याने संसार तुटले. पुरुष व सासरचे जबाबदारी घेण्यास तयार नसल्याने स्त्रिया परित्यक्ता झाल्या.

११) ०३ (५.००%) असे वाटते की, संयुक्त कुटुंब असावे यामुळे ज्येष्ठ लोकांचे योग्य मार्गदर्शन मिळते ज्येष्ठांच्या मुलांसाठी संस्कार व सांभाळ करण्यासाठी फायदा होतो. पुढे कुटुंबात वाद–विवाद झाले तर ज्येष्ठ लोक मध्यस्थाची भूमिका पार पाडून प्रश्न मार्गी लावत व त्यावेळी ज्येष्ठाचे सर्वजण ऐकत पण असायचे पण सध्या संयुक्त कुटुंब पध्दतीचा ऱ्हास होत असल्याने पतीपत्नीवर नियंत्रण राहिले नाही. वाद–विवाद, भांडणामध्ये वाढ होऊन परित्यक्तांचे प्रश्न वाढतच आहे.

१२) ०२ (३.३३%) परित्यक्तांना असे वाटते की, कायद्याच्या प्रचार व प्रसारामुळे कायद्याचे लोक साक्षर झाले आहेत. ही गोष्ट चांगली आहे पण ते अपुरे ज्ञानाच्या आधारे लोक कोर्टात केसेस दाखल करताना समोरच्या पक्षकाराला तळ्यात मळ्यात पाहतात. बदला घेण्याची वृत्ती कुठेतरी मनात असते. जे कायद्याचे जाणकार आहेत ते पण काही वेळा चुकीचे मार्गदर्शन करतात. कायद्याच्या लढाईत होरपळून जातात. अशी कारणे या संशोधन अभ्यासावरुन दिसून येतात.

**सूचना आणि शिफारशी :**

१) परित्यक्ता होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी सर्वप्रथम प्रशिक्षित समुपदेशक, मध्यस्थ, धर्मगुरू, स्वयंसेवी संस्था, व इतर तज्ञ व्यक्तीकडून समस्याग्रस्त व्यक्तींनी समुपदेशन घेऊन आपले प्रश्न सोडविले पाहिजे.

२) मुस्लीम समाजात युवक मंडळे, स्वयंसेवी संस्था, महिलांसाठी काम करणाऱ्या संस्था, संघटना ह्या सध्या बऱ्यापैकी अस्तित्वात आल्या आहेत त्यांनी पुढाकार घेऊन कौटुंबिक समस्याग्रस्तांसाठी समुपदेशन केंद्र चालवावे.

३) सामाजिक स्तरावर जाणीव जागृती करण्यासाठी शासनाने विविध प्रशिक्षण/कार्यशाळा/चर्चासत्राचे आयोजन वस्ती पातळीवर करावे आणि त्या कार्यक्रमामध्ये कौटुंबिक हिंसाचार, बालविवाह पालकांचा नको तो हस्तक्षेप, व्यक्तिमत्त्व विकास, कौटुंबिक कलहामुळे होणारी कुटुंबाची अधोगती, हिंसाचाराचे स्त्री–पुरुषाबरोबर मुलांवर होणारे परिणाम या विषयावर प्रकर्षाने प्रकाश टाकावे.

४) उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी शासनाने स्वतंत्र कार्यक्रम राबवावे आणि मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य द्यावे.

५) कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी औपचारिक शिक्षणाबरोबर व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमावर भर द्यावा.

६) मुस्लीम समाजाने मुख्य प्रवाहात येण्यासाठी उर्दू माध्यमातून मुलांना न शिकविता मराठी, हिन्दी, किंवा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाठवावे, उर्दू माध्यमामुळे शासकीय नोकऱ्या किंवा खाजगी नोकरीमध्ये स्थान नाही. उर्दू शिक्षण जरूर घ्यावे पण फक्त लिहिता वाचता येण्यासाठी आसावे.

७) शासनाने कायद्याचे मोफत सहाय्य व सल्ला केंद्राची स्थापन करून वस्ती पातळीवर कायद्याचे प्रशिक्षण घ्यावे व गैरवापर कसा टाळता येईल याची दक्षता घ्यावे.

८) ज्येष्ठ नागरीकांना बदलत्या काळानुसार नव्या पिढीचा नवा विचार स्वीकारून त्यांच्या विचारांना पण महत्त्व द्यावे. त्यांना समजून घेतले पाहिजे आणि तरुण पिढीसोबत शेअरींग वाढवावे.

९) पती–पत्नीमधील संवाद व संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी सक्रिय व्हावे. विवाहपूर्व समुपदेशन कार्यक्रम सुरू करावेत ही काळाची गरज आहे. यासाठी शासनाने पण आर्थिक मदत उपलब्ध करावे व प्रोत्साहन द्यावे.

१०) पती–पत्नीने स्वतःमधील शेअरींग वाढवावे, भविष्याचा आणि मुलांचा विचार करुन अनावश्यक खर्चावर विराम लावावा. स्वतःचे वाद स्वतःच कौटुंबिक पातळीवर सोडवावे आणि संयुक्त कुटुंब कसे टिकून राहील यासाठी प्रयत्नशील राहावे.

११) शासनाने शिक्षण व वैचारिक क्षमता वाढविण्यासाठी लक्ष दिले पाहिजे इतर प्रगतशील समाजाच्या प्रवाहासोबत संपर्कात आल्यास पती–पत्नीची समज वाढेल व त्यांच्या नातेसंबंधातील संबंध कसे चांगले ठेवावे याची जाणीव होईल आणि चुकीच्या रुढी परंपरांना विरोध करुन ते थांबविण्यासाठी स्वतःच प्रयत्न करतील.

१२) जगातील अनेक मुस्लीम राष्ट्रांनी बदलत्या काळानुसार त्यांच्या वैयक्तिक कायद्यात परिवर्तन केले आहेत तसे परिवर्तन भारतात होण्याची आवश्यकता आहे.

**समारोप :**

वरील कारणे त्यांचे निष्कर्ष, उपाय योजना नुसार असे निदर्शनास येते की, कोणत्याही व्यक्तीचा वैयक्तिक, कौटुंबिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकास साधावयाचा असल्यास प्रथम कौटुंबिक स्वास्थ टिकविणे आवश्यक आहे. कौटुंबिक पातळीवर अनेक समस्या असतील तर प्रगती होणे शक्य नाही मुस्लीम धर्मात काही धार्मिक शिकवणी खूप चांगल्या आहेत त्या शिकवणीचे सर्वांनी पालन केले तर स्त्रियांवर अत्याचार / हिंसाचार होणार नाहीत. कोणत्याही धर्मातील स्त्रिया जोपर्यंत त्यांचे स्वातंत्र्य सुक्ष्मरीत्या उपभोगू शकत नाही तोपर्यन्त त्यांचा विकास होणार नाही. कौटुंबिक हिंसाचार हा विषय केवळ कायद्याने संपनारा विषय नाही तर यासाठी समाजामध्ये जाणीव जागृती आणि परिवर्तन होण्याची गरज आहे तरच शोषण/हिंसा मुक्त समाज निर्माण होईल.

**संदर्भसुची**

*गुप्ते, मनीषा, मोरे, अर्चना. चक्रभेद (२००७). मासुम प्रकाशन पुणे*

*भागवत, विद्युत. रेगे, शर्मिला. (डिसेंबर २०००). भारतातील समकालीन काळीचे प्रश्न स्त्रीवादी चर्चाविश्वाचा आढावा. स्त्रीअभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ.*

*बिन्ते इस्लाम (प्रो.अब्दुर्रहमान शेख अनुवादक). न्यायनिष्ठा (२००७). इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट, मुंबई.*

*खान मुहम्मद फारुक (२०१४). दुसरी आवृत्ती. इस्लाम म्हणजे काय इस्लामीक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट मुंबई.*